# सोलापूर विद्यापीठ
## परीक्षा व मूल्यमापन विभाग
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग केगाव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३ /७४/७८/७९
फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ :http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल: dbee@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# Solapur University
## Examinations & Evaluation Section
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-४१३ २५५
EPABX No. ०२१७- २७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३/७४/७८/७९
Fax No.०२१७-२७४४७७०
Web Site : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id: dbee@sus.ac.in


**जा. क्रं. सोविसो/परीक्षा/२०१८-१९/१२३३** **दि : ११/०५/२०१८**

**प्रति,**
**मा.प्राचार्य/प्राचार्या/संचालक.**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये/संकुले,**
**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.**

**विषय:- नॅशनल ॲकॅडमिक डिपॉझिटरी अंतर्गत पदवी प्रमाणपत्राची नोंदणी करणेबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारत सरकारच्या केंद्रीय मनुष्यबळ विकास विभागाने डिजिटल इंडिया अंतर्गत नॅशनल ॲकॅडमिक डिपॉझिटरी (NAD) हा अभिनव उपक्रम सुरु केला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्राचे डिजिटल सुरक्षा संचयन होणार असून प्रत्येक भारतीय विद्यार्थ्याचे डिजिटल शैक्षणिक प्रमाणपत्राचे स्वप्न साकार होणार आहे.

सोलापूर विद्यापीठाने यासाठी (CDSL) या कंपनी समवेत सामंजस्य करार केला आहे. ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र घेतेलेले आहेत (दहाव्या दीक्षांत समारंभापासून), त्या विद्यार्थ्यांना या अंतर्गत नोंदणी करता येणार आहे. यासाठी विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना होम पेजवर असलेल्या Application Form या शिर्षकाखाली Online Degree Certificate Depository (NAD) या लिंकवर क्लिक करुन आपली नोंदणी करता येणार आहे.

**डिग्री सर्टिफिकेशन डिपॉझिटरी (NAD) साठी खालील पध्दतीने नोंदणी करता येणार आहे.**

अ) ज्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड असेल व या आधार कार्डशी जो भ्रमणध्वनी क्रमांक लिंक केलेला असेल त्या भ्रमणध्वनी क्रमांकावर ओटीपी प्राप्त होईल व त्याचा वापर करुन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी , त्यात NAD क्रमांक विद्यार्थ्यांना प्राप्त होईल. त्याद्वारे विद्यार्थ्यांचे NAD Account तयार झाल्यानंतर त्यांना डिजिटल स्वाक्षरीचे पदवी प्रमाणपत्र त्यांच्या NAD Login मध्ये उपलब्ध होईल.

ब) ज्या विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड नाही, त्यांना देखील नोंदणी करता येणार असून त्या विद्यार्थ्यांना नोंदणीच्या वेळी आपला फोटो व स्वाक्षरी अपलोड करावी. त्यात NAD क्रमांक विद्यार्थ्यांना प्राप्त होईल. त्याद्वारे विद्यार्थ्यांचे NAD Account तयार झाल्यानंतर विद्यार्थ्यांने जो ई-मेल आयडी नोंदणी करण्याकरीता दिलेला आहे, तो विद्यापीठाच्या convocation@sus.ac.in या मेल आयडीवर ई-मेल करावा.

उपरोक्त प्रमाणे नोंदणी करताना काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास NAD कॉल सेंटरवरील दूरध्वनी क्र. २२२३०५८७६०/२२२३०५८७६१ वर संपर्क साधावा.

ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता अर्ज केलेला आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी पदवी प्रदान समारंभानंतर नॅशनल ॲकॅडमिक डिपॉझिटरी (NAD) अंतर्गत नोंदणी करणे अनिवार्य आहे. या सुविधेमुळे डिजिटल व ऑनलाईन प्रमाणपत्र सुरक्षित राहणार असून प्रमाणपत्राची प्रत विद्यार्थ्यांना स्वत: जवळ बाळगण्याची गरज भासणार नाही. कुठेही सहजपणे हे प्रमाणपत्र ऑनलाईन पाहता येणार असून नियुक्ती देणा-या संस्था, कंपन्या, बँका यांना तात्काळ प्रमाणपत्राची ऑनलाईन पडताळणी करता येणार आहे. नोंदणीबाबतच्या प्रक्रियेची रितसर माहिती विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तरी आपण सदरची बाब आपल्या महाविद्यालयात/विभागातील सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून ज्या विद्यार्थ्यांनी (दहाव्या दिक्षांत समारंभापासून) पदवी प्रमाणपत्र घेतलेले आहे, त्यांना या प्रक्रियेत नोंदणी करण्यास प्रोत्साहित करावे.

कळावे,

आपला विश्वासू ,

PATIL BHATUPRASAD PRABHAKAR

Digitally signed by PATIL BHATUPRASAD PRABHAKAR
DN: cn=PATIL BHATUPRASAD PRABHAKAR, c=IN, st=MAHARASHTRA, o=SOLAPUR UNIVERSITY, ou=EXAMINATIONS AND EVALUATION, serialNumber=1c9f78a35972bc358358c30906be0f2f7473da51a8fe8bf8b5ca214dbfe20483
Reason: Circular
Date: 2018.05.11 17:09:22 +05'30'

(बी. पी. पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Instruction Manual for Registration to NAD using Aadhar Number to link Degree Certificate is available on website